RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# मानवी हक्क व महिला सबलीकरण

**प्रा.अनुराधा संदिप गोल्हार**
सहा.प्राध्यापक
सौ. निर्मलाताई थोपटे महाविद्यालय, भोर
जि.पुणे

**डॉ. रामचंद व्हनबट्टे**
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा

## प्रस्तावना

प्रत्येक मानव हा स्वतंत्र रूपात जन्म घेतो. परंतु अनेक परिस्थितीत विरोध निर्माण होतात. संविधानाने प्रत्येक भारतीय नागरीकाला मुलभूत अधिका बहाल केले आहेत. **21** व्या शतकात **2020** नंतर महासत्ता होणार हे स्वप्न पाहणा-या भारत देशात भारतीय स्त्री आर्थिक, सामाजिक, शारीरिक गुलामगिरीच्या विळख्यात जखडलेली आहे. सुस्कृंत समाजात जगणारी स्त्री स्वतः कोणत्या ना कोणत्या अन्यायाला सामोरी जाताना दिसते. याचे मुख्य कारण आपली पुरूषप्रधान संस्कृती रूढीप्रिय समाजाने तिला भावनिक, आर्थिक, शारीरिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सर्व आघाडयावर अन्याय व अत्याचाराच्या विळख्यात जखडून ठेवले आहे. इ.सन. **1946** पासून मानवी अधिकार आयोगाने स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक अधिकार प्रदान केले आहेत. **1975** मध्ये युनोने स्त्रियांच्या मानवी हक्कावर चर्चा होण्यासाठी काही ठोस पाऊले ऊचलली व त्याचाच परिपाक म्हणजे पहिली जागतिक महिला परिषद झाली. तसेच **1975** मध्ये मेक्सिकोत त्यानंतर **1982** मध्ये कोपनहेगन व नंतर **1995** मध्ये बिर्जीग येथे हया जागतिक महिला परिषद साकार झाल्या.

महिलांना समाजात एक आदरयुक्त दर्जा प्राप्त करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे.

म - महान

हि-हिम्मवाली

ला - लाचार न घेणारी

प्राचीन काळापासून इतिहास स्त्रियांना मानाचे स्थान दिले.

## स्त्रियांची भूमिका

1) **सुजाण नागरिक निर्मितीत भूमिका** कुटुंबात स्त्री विविध भूमिका करते. उदा. मुलगी, आई, पत्नी या भूमिका करताना राष्ट्रविकासासाठी सुजाण नागरिक घडविते.

2) **राजकिय नेतृत्व** राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा उत्तरम सहभाग आहे. स्त्री ही देशाचा कारभार उत्तर प्रकारे चालवू शकते. उदा.भारतचे पंतप्रधान - इंदिरा गांधी

3) **प्रशासकीय अधिकारी** उत्तम प्रशासक म्हणून कामगिरी करतात व चांगला बदल घडवून आणत आहेत.उदा. किरण वेदी

4) **मार्गदर्शक** मानसिकदृष्टया पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये समायोजनक्षमता अधिक असते. उदा. सिंधूताई सपकाळ

5) **राष्ट्रविकासातील आधार** राष्ट्रविकास साधण्यासाठी स्त्रिची भूमिका महत्वाची आहे. एखादया राष्ट्राकडून स्त्रिला दिल्या जाणा-या सामाजिक व राजकिय महत्वावरून त्या राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते.

6) **कर्तव्यदक्षता** स्त्री आज प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. स्त्रीने आज राष्ट्रविकासातील रथाच्या दुस-या चाकाची कर्त व्यदक्ष भूमिका स्विकारली आहे. उदा. जिजाऊमुळे शिवछत्रपती घडले. यशोदेमुळे श्रीकृष्ण घडले.

## राज्यघटनेतील स्त्री यांच्या हक्कविषयक तरतुदी

भारत देशात संविधानाने भारतीय स्त्रीयांना विशेष अधिकार दिलेले आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

1) स्त्रीयांना परंपरेनुसार हीन समजून तिच्यावर अन्याय होत आहे. हा अन्याय मिटविण्यासाठी संविधान शासनाला स्त्रीयांच्या हिताच्या दृष्टीने विशेष नियम तयार करण्याची परवानगी देते.

2) संविधानाव्दारे शासन सर्व कमजोर वर्ग ज्यात स्त्रियांचा समावेश आहे. त्यांच्यामध्ये सुधारणा करून आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावे.

3) सार्वजनिक नोकरीत समान अधिकार आहे.

4) समान वेतनाचा अधिकार आहे.

स्त्रीयांच्या अधिकारांचे वर्गीकरण

**स्त्रीयांचे अधिकार**

1) कायालयीन कार्य करणा-या स्त्रियाचे हक्क 2) विवाह हक्क 3) धार्मिक हक्क 4) सामाजिक हक्क 5) न्यायालयीन हक्क 6) संपत्तीसंबंधी 7) कौटुंबिक 8) स्त्रीयांचे मानवी हक्क

## नोकरी करणा-या स्त्रीयांचे हक्क

1) काम करणा-या प्रत्येक स्त्री व पुरूषाला समाान वेतन देण्यात यावे.

2) शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे स्त्रीयांना वेतन देण्यात यावे.

3) एकाच प्रकारचे काम स्त्री व पुरूष करीत असल्यास त्यांना बरोबरीने वेतन दयावे.

4) स्त्रीयांना गर्भावस्था व प्रसूती संबंधी काही विशेष हक्क देण्यात आले आहेत.

## महिला सबलीकरणासाठी उपाययोजना

1) समाजातील प्रत्येक क्षेत्रात बरोबरीचे स्थान

2) स्त्री पुरूष समानता

3) साक्षरता

4) स्त्रीयांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

5) आदराची वागणूक

6) अनिष्ट रूढी, परंपरा बंद करणे.

## समारोप

अशा प्रकारे स्त्री पुरूष समानता निर्माण होणे आवश्यक आहे. राजकीय क्षेत्रात आरक्षणातील समानता यावी. स्त्री पुरूष संघर्ष नको. स्त्री हक्काबाबत प्रत्येकात मानसिकता तयार व्हायला हवी. प्रत्येक पुरूषात महात्मा गांधीजी, महात्मा फुले व स्वामी विवेकानंद यांचे विचार रूजणे आवश्यक तरच महिला सबलीकरण पुर्ण होईल.

## संदर्भ

1. शैक्षणिक तत्वज्ञान - म.वा. कुंडले
2. स्त्री मुक्तीचा आत्मस्वर - तारा भवाळकर श्रीविद्या प्रकाशन पुणे.
3. माधव कवि (1999), महिला कल्याण व विकास विद्या प्रकाशन, नागपूर डॉ.किशोच चव्हाण
4. शिक्षणतरंग ( मार्च 2012), इनसाईट पब्लिकेशन नाशिक.